| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHKO070009982016 | दाखल दिनांक | :– | २०/०८/२०१६ | | |
| | नोंदणी दिनांक | :– | २३/०८/२०१६ | | |
| | निकाल दिनांक | :– | ०५/०५/२०२६ | | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०९ | ०८ | १६ |

**सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) जयसिंगपूर,**
**ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**( पीठासीन अधिकारी अ. त्रिं. मनगिरे )**

**नियमीत दिवाणी मु.क्र.१८६/२०१६** **निशाणी क्र.७७/अ**

**वादी :**

१) **श्रीमती मथूरा उर्फ संगिता शिवाजी कोकरे,**
वय ४२ वर्षे, धंदा– घरकाम
रा.माळभाग, कुंभोज रोड, हिंगणगांव,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

२) **ज्योती शिवाजी कोकरे,**
लग्नानंतरचे नांव
वय २१ वर्षे, धंदा– घरकाम
रा.सदर

**विरुध्द**

**प्रतिवादी :**

१) **श्रीमती राजूबाई रामा कोकरे,**
वय ७० वर्षे, धंदा– घरकाम
रा. कोंडीग्रे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

२) **सौ. शांताबाई बाबासो खरात,**
वय ४४ वर्षे, धंदा– घरकाम
रा. बिरदेववाडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

३) **श्रीमती इंदूबाई शिवाजी कोकरे,**
स्वतःस म्हणवते
वय ४५ वर्षे, धंदा– घरकाम
रा. हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

४) **ज्ञानेश्वर शिवाजी कोकरे,**
स्वतःस म्हणवतो
वय २६ वर्षे, धंदा– शिक्षण
रा. कोंडीग्रे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

५) **गणेश शिवाजी कोकरे,**
स्वतःस म्हणवतो
वय २४ वर्षे, धंदा– शिक्षण
रा. सदर

६) **सविता गोरखनाथ शेंडगे म.वा.,**

६.१) **गोरखनाथ मुरलीधर शेंडगे,**
वय ७० वर्षे, धंदा– शेती

६.२) **वैभव गोरखनाथ शेंडगे,**
वय ५० वर्षे, धंदा– नोकरी

६.३) **रेश्मा गोरखनाथ शेंडगे,**
वय ५२ वर्षे, धंदा– घरकाम

६.४) **गुरुनाथ गोरखनाथ शेंडगे,**
वय ५२ वर्षे, धंदा– घरकाम
सर्व रा. मु.पो.कोते (चॉद)
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**दावा :** **वाटप, तुटक कब्जा आणि मनाईचा.**

=========================================

| | |
|---|---|
| वादींतर्फे वकील | :- श्री. बी.एस.माने |
| प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे वकील | :- श्री. एस.डी.जगदाळे |
| प्रतिवादी क्र.६.१ ते ६.४ तर्फे वकील | :- श्री. एस.बी.पाटील |

=========================================

:: न्यायनिर्णय ::

( घोषित दिनांकः- ०५ मे, २०२६)

प्रस्तुतचा दावा वाटप, तुटक कब्जा आणि मनाईसाठी दाखल करण्यात आला आहे.

**वादींचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे :-**

**०२**. दावा मिळकतीचे वर्णन - जि.कोल्हापूर, ता.शिरोळ पैकी मौ.कोंडीग्रे हद्दीतील शेत मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे -

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १५० | ४.७४<br>पो.ख.०.४०<br>पैकी ०.७२.३३<br>पो.ख.०.०६ | १९.५० |

यासी चतुःसिमा -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | नांद्रेकर यांची मिळकत. |
| पश्चिमेस | - | सदाशिव खिलारे यांची मिळकत. |
| दक्षिणेस | - | ओढा व यादव यांची मिळकत. |
| उत्तरेस | - | रस्ता व दत्ता लांडगे यांची मिळकत. |

**ब)** जि.कोल्हापूर, ता.शिरोळ पैकी मौ.कोंडीग्रे ग्रामपंचायत हद्दीतील घर मिळकत मालमत्ता क्र.८२ याचे एकुण क्षेत्रफळ ७५.८१ चौ.मी. (८१६ चौ.फुट) यात असले दगड, विट मातीचे, कौलारू घर, विज कनेक्शन व खुली जागा यासी चतुःसिमा –

पुर्वेस – कच्चा रस्ता.
पश्चिमेस – कांतीनाथ कोकरे यांची मिळकत.
दक्षिणेस – अंगण व डांबरी रस्ता.
उत्तरेस – पाऊलवाट

येणेप्रमाणे नमुद केलेल्या मिळकतींस यापुढे दाव्यात **<u>दावा मिळकत</u>** असे संबोधले आहे.

**०३.** यातील वादी, प्रतिवादी यांची नाती समजण्यापुर्ती वंशावळ खालीलप्रमाणे –

रामा (मयत २६/१/२००९)
––– राजूबाई (प्रतिवादी क्र.१)

शिवाजी (मयत २९/११/२००८)
––– मथुरा उर्फ संगिता
(वादी क्र.१)

ज्योती (वादी क्र.२)

शांताबाई
(प्रतिवादी क्र.२)

वंशावळीमध्ये नमुद केल्याप्रमाणे वादी प्रतिवादी यांचे कुटुंबातील रामा हा मुळ पुरुष ते दि.२६/१/२००९ रोजी मयत आहेत. त्याची पत्नी राजूबाई (प्रतिवादी क्र.१) रामा व राजूबाई यांना शिवाजी व शांताबाई अशी दोन अपत्ये पैकी शिवाजी हे दि.२९/११/२००८ रोजी मयत आहेत.

**०४.** वादी क्र.१ व शिवाजी यांचा विवाह ता.१४/०४/१९८७ रोजी कोंडीग्रे येथे हिंदू धर्मातील पध्दतीनुसार पै पाहुण्यांच्या समक्ष पार पडला. तेव्हापासुन वादी क्र.१ शिवाजी हे पती पत्नी म्हणुन एकत्र राहतात व समाजात वावरत आलेले आहेत. लग्नानंतर काही वर्षे वादी क्र.१ व तिचे पती शिवाजी हे कोंडीग्रे येथे राहणेस होते. पुढे नोकरी निमित्ताने ते हातकणंगले येथे राहणेस गेले. दि.२८/८/१९९५ रोजी वादी क्र.१ व शिवाजी यांना मुलगी झाली तिचे नांव ज्योती असे ठेवण्यात आले. वादी व शिवाजी हे बरेच वर्षे हातकणंगले येथेच भाडयाने राहण्यास होते. त्यांना तेथील लोक पती पत्नी म्हणुन ओळखत होते. पुढे औद्योगिक वसाहतीमध्ये मंदी पडलेने वादी व तिचे नव–याने हिंगणगांव येथे जावुन राहण्याचा निर्णय घेतला व तेथे राहणेस गेले.


**०५.** वादी व शिवाजी यांना मुलगा नसलेने शिवाजीचे आई वडीलांनी वंशास दिवा पाहिजे म्हणुन शिवाजीचे दुसरे लग्न प्रतिवादी क्र.३ हिचे बरोबर लावलेचा बनाव केला. मात्र प्रत्यक्षात शिवाजी व प्रतिवादी क्र.३ यांचा विवाह कोणत्याही पध्दतीने झालेला नाही किंवा ते पती पत्नी म्हणुन राहिलेले नाहीत. प्रतिवादी क्र.४ व ५ ही मुले प्रतिवादी क्र.३ हिला शिवाजी पासुन झालेले नाहीत.

**०६.** वादी या हिंगणगांव येथे राहणेस असलेचा गैरफायदा घेवुन प्रतिवादींनी दावा मिळकतीस केवळ आपलीच नावे नमुद करुन घेतली आहेत ती बेकायदेशीर आहेत. ही गोष्ट वादीस कळालेनंतर प्रतिवादींचेकडे आपला दावा मिळकती मधील हिस्सा मागीतला असता प्रतिवादींनी तो देण्यास साफ नकार दिला. सदर मिळकत तबदिल करण्याच्या प्रयत्नात आहे. म्हणुन वादीस वाटपाचा व मनाईचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे वादींनी त्यांचा दावा मंजुर करण्याची मागणी केली आहे.

**०७.** प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांची कैफियत नि.क्र.१६ कडे दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.६.१ ते ६.४ यांनी नि.क्र.६५ ला पुरसीस देवुन त्यात नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादीचे दावेस जी कैफियत दिली आहे तीच कैफियत त्यांची म्हणुन वाचण्यात यावी. त्या कैफियतीमध्ये त्यांचे थोडक्यात कथन असे की, यातील वादी

यांचा दावा खोटा व चुकीचा आहे. सदर दावा यातील वादी यांना मान्य व कबुल नाही. यातील वादी यांनी केलेले दावा मिळकतीचे वर्णन अपुरे व मोघम स्वरुपाचे आहे.

०८.	यातील वादी यांनी दिलेली दावा अर्जी कलम २ मधील वंशावळ संपुर्ण चुकीची आहे. यातील वादी क्र.१ व २ या मयत शिवाजी रामा कोकरे यांचे नात्याने कोणीही लागत नाहीत. खारी वंशावळ खालीलप्रमाणे –




येणेप्रमाणे वंशावळ आहे. वरील वंशावळप्रमाणे मुळ रामा हा दि.२६/११/०९ रोजी मयत झालेला आहे. शिवाजी हा दि.२९/११/२००८ रोजी मयत झालेला आहे. मयत शिवाजी यास धर्मपत्नी इंदूबाई ही होय, तर इंदूबाईला शिवाजी रामा कोकरे यांचे पासुन उपजलेली ज्ञानेश्वर व गणेश ही दोन अपत्ये होय. त्यामुळे या दावेकामी वादींनी दिलेली वंशावळ संपुर्ण चुकीची असुन ती यातील प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. वादी क्र.१ व २ यांचा शिवाजी रामा कोकरे यांचेशी कोणताही अगर कसलाही संबध अजीबात नव्हता व नाही.

०९.	वादीने दिलेले दावेस कारण धादांत खोटे आहे, तसेच वादीने आणलेला वाटपाचा दावा व त्यात मागीतलेल्या दादी या संपूर्णपणे प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व

कबुल नाही.

१०. <u>याबाबत वस्तुस्थिती अशी की,</u>

प्रस्तुत प्रतिवादी क्र.३ हिचा शिवाजी रामा कोकरे यांचेशी विवाह दि.१६/५/९० रोजी झालेला आहे. विवाह समयी याद्या लिहुन मंगळअष्टका, सप्तपदी, मंगळसुत्र बंधन इत्यादी सर्व विधी पुर्ण झालेल्या आहेत. त्याप्रमाणे विवाह तारखेपासुन शिवाजी रामा कोकरे व इंदूबाई शिवाजी कोकरे हे उभयंता रामा सत्याप्पा कोकरे, तसेच राजूबाई रामा कोकरे यांचे सोबत कोंडीग्रे येथे सुखा समाधानाने नवरा बायको म्हणुन नांदत होते. सदर लग्न बंधनातून शिवाजी व इंदूबाई यांना ज्ञानेश्वर म्हणजे प्रतिवादी क्र.४ हे अपत्य दिनांक २५/१०/१९९१ इ. रोजी झालेले आहे. तसेच गणेश शिवाजी कोकरे यांचा जन्म दिनांक २०/१/१९९४ इ. रोजी झालेला आहे. रामा यांचे निधनानंतर प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.३, ४, ५ हे व शिवाजी हे एकत्रच कोंडीग्रे येथेच सुखासमाधानाने संसार करीत होते, त्यानुसार रेशनकार्डला सुध्दा कोंडीग्रे येथे सर्वांची नावे नमुद आहेत. यातील वादी यांचा रामा सत्याप्पा कोकरे अगर शिवाजी रामा कोकरे यांच्याशी कोणत्याही नात्याचा संबंध अजीबात नव्हता व नाही. मयत शिवाजी रामा कोकरे हा दारुचे व्यसनाधीन होता, त्यामुळे वरील प्रतिवादी क्र.४, ५ यांच्या जन्मानंतर तो कामधंद्या निमित्त बाहेर गावीच फिरत होता. तो व्यसनाधीन झाल्याने रामा सत्याप्पा कोकरे व राजूबाई रामा कोकरे या उभयतांनी त्यास घरा बाहेर काढले. परंतू अधुनमधुन तो कोंडीग्रे गांवी येतच होता अशी वस्तुस्थिती होती. रामाचे निधनानंतर यातील प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी आपली वडीलोपार्जित शेती सांभाळून मोलमजूरी करुन प्रतिवादी क्र.३ व ४ यांची देखभाल केलेली आहे. शिवाजी मयत होईपावेतो अगर त्यापुर्वी यातील वादी क्र.१ व २ ज्या स्वतःस शिवाजीची पत्नी व शिवाजीची मुलगी म्हणतात त्या कधीही कोंडीग्रे गांवी आलेल्या नव्हत्या व नाहीत. शिवाजी रामा कोकरे हा प्रतिवादी कुटूंबातच मयत झालेला आहे. शिवाजी मयत झाल्यानंतर दि.२६/१/२००९ रोजी रामा सत्याप्पा कोकरे हे कोंडीग्रे येथेच प्रतिवादीच्या कुटूंबात मयत झालेले आहेत. यातील वादी ही कधीही कोंडीग्रे गावात आलेल्या नव्हत्या व नाही. हिंगणगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या गावाशी मयत शिवाजी रामा कोकरे यांची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता असल्याचे प्रस्तुत प्रतिवादी यांना ज्ञात नाही.

मयत शिवाजी रामा कोकरे यांच्या नावाचा गैरवापर करुन वादी यांनी काही कागदपत्रे खोटीनाटी तयार केल्याचे असल्यास त्याची माहिती प्रस्तुत प्रतिवादी यांना नाही. यातील वादीनीच हजर केलेल्या कागदपत्रावरुन मथुरा शिवाजी कोकरे म्हणजेच वादी हिचा जन्म १९७५ साली झाला असे दर्शवलेले आहे आणि दावा अर्जी कलम ३ मध्ये वादी क्र.१ व शिवाजी यांचा विवाह दि.७/५/८७ रोजी झाला असे लिहले आहे, त्यामुळे १२ वर्षांच्या मुलीशी शिवाजी यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न वादीनी खोटारडेपणाने केलेला आहे. यावरुनच वादी क्र.१ ही शिवाजीची पत्नी कधीही नव्हती व नाही. वादीचा विवाह दि.७/५/१९८७ रोजी होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. याउलट प्रस्तुत प्रतिवादी क्र.३ हिचे वय विचारात घेता प्रतिवादी क्र.३ हीच कायद्याने मयत शिवाजी रामा कोकरे यांची प्रथन धर्मपत्नी आहे हे सिध्द होते. प्रतिवादी क्र.४ यांचा जन्म हा प्रतिवादी यांच्या कुटूंबात दि.२५/१०/१९९१ रोजी झालेला आहे. त्यामुळे दावा अर्ज कलम ४ मध्ये वादी यांनी नमूद केलेला मजकुर "वंशास दिवा पाहिजे" असे म्हणणेचा प्रश्नच निर्माण होत नाही, कारण दावा अर्जी कलम ३ मध्ये वादी क्र.२ हिचा जन्म ता.२८/८/१९९५ रोजी झाला असे वादीचेच कथन आहे. त्यामुळे बेमालूम खोटे विधान करुन नसलेले हक्क प्राप्त करणेचा कुटील डाव यातील वादी केलेला आहे. वादी क्र.१ व २ यांना शिवाजीचे वारस म्हणुन सदरचा दावा दाखल करणेचा कायद्यानेच कोणताही अधिकार अजीबात नाही वा हिंदू वारस कायद्याप्रमाणे वादीना कोणताही हक्क व अधिकार नाही. रामा सत्याप्पा कोकरे अगर शिवाजी रामा कोकरे यांचे वडीलार्जित मिळकतीमध्ये कोणताही हक्क व अधिकार प्राप्त होत नाही. वादी क्र.१ व शिवाजी रामा कोकरे हे कधीही पती पत्नी म्हणुन नांदले नाहीत वा त्यांना कोणीही पती–पत्नी म्हणुन ओळखतही नाहीत. शिवाजी हा हातकणंगले येथे अगर हिंगणगांव येथे कधीही राहीलेला नव्हता व नाही.

**११.** दावा मिळकतीशी वादी क्र.१ व २ यांचा कायद्याने कोणताही हित हक्कसंबंध अजीबात नाही, त्यांना दावा मिळकतीत वाटप करुन मागणेचा कोणताही हक्क नाही, तसेच यातील प्रतिवादी क्र.३ हीच मयत शिवाजी रामा कोकरे यांची कायदेशीर प्रथम धर्मपत्नी असल्याचे व प्रतिवादी क्र.४ व ५ ही शिवाजी रामा कोकरे यांची औरस संतती असलेचे व कोंडीग्रे गावी, तसेच आसपासचे पंचक्रोशीत प्रतिवादी क्र.३ व शिवाजी हे पती पत्नी म्हणुनच वावरत होते व कोंडीग्रे येथेच प्रतिवादी यांच्या कुटूंबात एकत्रात संसार करत होते व संपूर्ण

समाजास ही गोष्ट पुर्णपणे ज्ञात होती व आहे. गावच्या कागदोपत्री वारसा ठरावाने प्रतिवादी यांच्या नावाची नोंद सन २०११ मध्येच झालेल्या आहेत. शिवाजी रामा कोकरे यांच वादी क्र.१ ही मुळीच पत्नी नाही. तसेच वादी क्र.२ ही मुलगी सुध्दा नाही. आधारकार्ड किंवा मतदान ओळखपत्रास शिवाजी यांचे नांव बेमालून खोटे वादीने लावलेले आहे. शिवाजी यांचे नांव यातील प्रतिवादी यांच्या कुटूंबाच्या रेशनकार्डमध्ये पुर्वापार आहे, ते कोणत्याही प्रकारे कमी झालेले नाही. त्यामुळे खोटे रेशनकार्ड तयार करुन व खोटे कागदपत्रे तयार करुन यातील वादीनी प्रस्तुत प्रतिवादी यांच्या विरुध्द खोटा दावा व मनाई अर्ज दाखल केलेला आहे. वादीचे दाव्याच्या कथनावरुन वादीने शिवाजीचे नावाचा गैरफायदा घेवुन दावा मिळकतीमध्ये बेकायदा हक्क प्रस्थापित करणेच्या उद्देशाने सदरच्या दाव्याची व मनाई अर्जाची रचना केलेली आहे. वादीच्या दाव्यातील कथनानुसार व वादी क्र.२ हिचा जन्म व प्रतिवादी क्र.४ हिचा झालेच्या तारखा विचारात घेता व वादीनी दावेकामी घेतलेली कथने विचारात घेता वादी क्र.१ व २ यांचा शिवाजी रामा कोकरे यांच्याशी कोणत्याही कायदेशीर नात्याचा हक्क, हितसंबंध वादीना येत नाही हे स्पष्ट होते. बेमालूम व खोटया तारखा घालून व प्रतिवादी क्र.३ ही शिवाजी रामा कोकरे यांची कायदेशीर धर्मपत्नी आहे व प्रतिवादी क्र.४ व ५ ही मुले शिवाजी रामा कोकरे यास प्रतिवादी क्र.३ बरोबर असलेल्या कायदेशीर विवाह संबंधातून उपजलेली संतती आहे, याची माहिती असतानाही वादीनी या दावेची व मनाई अर्जाची रचना धादांत खोटी केलेली आहे. वादी क्र.१ व २ यांना मयत शिवाजी रामा कोकरे यांचे वडीलोपार्जित मिळकतीमध्ये वाटप मागणेचा कायद्याने कोणताही हक्क व अधिकार नाही.

**१२.** मुळ रामा सत्याप्पा लोकरे यांना सविता या नावाची एक मुलगी होती, ती मयत आहे. तीच्या वारसांना या दावेकामी पक्षकार केलेले नसल्याने त्याही कारणावरुन वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळणेस पात्र आहे. वादीचे दावेस कोणतेही कारण घडले नाही, केवळ दावा मिळकतीत नसलेले हक्क प्राप्त करणेच्या हेतूने वादीने दावेस कारण बनावटरित्या घातलेले आहे. हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीप्रमाणे वादीचा दावा मिळकतीशी कोणताही अगर केवढाही वारसा हक्क, हितसंबंध येत नाहीत, त्यामुळे कायद्याने तुर्तातुर्त मनाई मागणेचा वादीना कोणताही कायद्याने अधिकार नाही. दावा मिळकती हया प्रतिवादी कोणत्याही प्रकार तबदील मुळीच करणार नाही, कारण प्रस्तुत प्रतिवादीच्या

कुटूंबाचे ते एकमेव उपजिवीकेचे साधन आहे. प्रायमाफेसी केस, बॅलन्स ऑफ कनव्हीनियन्सचा विचार करता व इरिपेरेबल लॉसचा विचार करता वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज फेटाळणेस पात्र आहे. वादीने मटेरीयल फॅक्टस लपवून ठेवलेले आहेत. विवाह संबंधात केलेली कथन पाहता व कागदोपत्री केलेल्या नोंदी पाहता वादीचा दावा व मनाई अर्ज धादांत खोटा आहे व त्यांना कोणताही कायद्याने अधिकार येत नाही याची माहिती असतानाही हा खोटा दावा या प्रतिवादीविरुध्द वादीनी दाखल केलेला आहे, तो रद्द होणेस पात्र आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादींचा दावा खर्चासह नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

**१३.** माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.१७ वर मुद्दे निश्चीत केलेले आहेत. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी क्र.१ ही शिवाजी रामा कोकरे यांची कायदेशीर लग्नाची पत्नी असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **...नकारार्थी** |
| २. | वादी क्र.१ व शिवाजी यांचे कायदेशीर लग्न बंधनातून वादी क्र.२ हिचा जन्म झाल्याचे वादी सिध्द करतात काय ? | **...नकारार्थी** |
| ३. | दावा मिळकत ही वादीची एकत्रित कुटूंबाची मिळकत आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ४. | वादी हे दाव्यात मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा वाटून मिळणेस पात्र आहेत काय ? असल्यास त्यांचा हिस्सा किती ? | **...नकारार्थी** |
| ५. | वादी हे दावा मिळकतीचे त्यांचे हिश्याचे दरम्यानचे उत्पन्न मिळणेस हक्कदार आहेत काय ? | **...नकारार्थी** |
| ५अ. | वादी हे मागणीप्रमाणे मनाई हुकूम मिळणेस पात्र आहेत काय ? | **...नकारार्थी** |
| ६. | काय आदेश व हुकूमनामा ? | **...अंतीम आदेशाप्रमाणे** |

## अभिलेखावरील पुरावा

**१४.** वादींनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ वादी क्र.१ चे शपथपत्र (नि.क्र.१९) वर आणि वादीतर्फे साक्षीदार क्र.२ तात्यासो लक्ष्मण जुगळे यांचे शपथपत्र (नि.क्र.४१) वर दाखल केलेले आहे. वादींन नि.क्र.४८ अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टर्थ प्रतिवादी क्र.३ श्रीमती इंदूबाई शिवाजी कोकरे यांचे शपथपत्र (नि.क्र.४९) वर दाखल केलेले आहे. प्रतिवादींनी पुढील पुरावा न दिल्यामुळे नि.क्र.१ वरील आदेशानुसार प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे.

## अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा

| अनु.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | मौजे कोंडीग्रे येथील गट नं.१५० चा डायरी उतारा क्र.४००५ | २३ |
| २ | मौजे कोंडीग्रे येथील गट नं.१५० चा ७/१२ उतारा | २४ |
| ३ | मौजे कोंडीग्रे येथील मिळकत नं.८२ ची आकारणी नोंद वहीची प्रत | २५ |
| ४ | जन्माचा दाखला | २६ |
| ५ | शिवाजी रामा कोकरे यांचा मृत्यूदाखला | २७ |
| ६ | वादी यांचे लाईट बिल | २८ |
| ७ | प्रतिवादी व त्यांचे पती व कुटूंबातील व्यक्तीची नावे असलेले रेशनकार्ड/शिधापत्रिका | ३३ |
| ८ | इंदूताई गोरे यांचा शाळा सोडल्याचा दाखला | ३४ |
| ९ | शिवाजी कोकरे व इंदूबाई गोरे यांचे विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र | ३५ |
| १० | ज्ञानेश्वर शिवाजी कोकरे यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | ३६ |
| ११ | गणेश शिवाजी कोकरे यांचा जन्माचा दाखला | ३७ |

| | | |
|---|---|---|
| १२ | गणेश शिवाजी कोकरे यांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | ३८ |
| १३ | शिवाजी रामा कोकरे यांचे मृत्यू प्रमाणपत्र | ३९ |
| १४ | रामा सत्याप्पा कोकरे यांचे मृत्यू प्रमाणपत्र | ४० |
| १५ | यादी विवाह ठराव संबंधी | ४२ |
| १६ | राजूबाई रामा कोकरे यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | ५० |
| १६ | इंदूबाई शिवाजी कोकरे यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | ५१ |
| १७ | शांताबाई खरात यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | ५२ |
| १८ | ज्ञानेश्वर शिवाजी कोकरे यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | ५३ |
| १९ | गणेश शिवाजी कोकरे यांचे आधारकार्डची व्हेरीफाईड प्रत | ५४ |
| २० | सविता शेंडगे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची प्रत | ७५ |

## :: कारणमिमांसा ::

### मुद्दे क्र.१ व २ करीता

**१५.** मुद्दे क्र.१ व २ हे एकाच साखळीतील दुवे असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रीत केले आहे.

**१६.** वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, कब्जा व मनाईसाठी दाखल केलेला आहे. मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, त्यांच्या लग्नाची नोंद ग्रामपंचायत कार्यालयाला झालेली आहे, त्याबाबतचा पुरावा त्या प्रकरणामध्ये दाखल करु शकतात. परंतू अत्यंत महत्वपुर्ण बाब अशी की, संधी असुनही त्यांनी तो पुरावा हा अभिलेखावर सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. त्यांच्याकडे कथित पुरावा असुनही त्यांनी तो सिध्द न केल्यामुळे वादींच्या सदरहू कथनावर शंका उपस्थित होत आहे. उलटतपक्षी प्रतिवादींनी आपली भिस्त ही विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र (नि.क्र.३५) व यादी विवाह ठराव संबंधी (नि.क्र.४२) हे अभिलेखावर सिध्द केल्यामुळे

प्रतिवादींचे त्या अनुषंगाने कथन हे खरे व बरोबर असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर शंका उपस्थीत होण्यास वाव असल्याचे दिसुन येत आहे.

**१७.** मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासामध्ये कथन केले आहे की, शिवाजी कोकरे यांच्या शिधापत्रिकामध्ये त्यांचे नाव नाही. प्रतिवादींनी शिधापत्रिका ही नि.क्र.३३ वर दाखल केलेली आहे त्याचे अवलोकन करता प्रतिवादींचा त्यांच्यातील नात्यासंबंधीचा मजकुर हा खरा व बरोबर असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर शंका उपस्थीत होण्यास वाव असल्याचे दिसुन येत आहे.

**१८.** मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात नाकारले आहे की, शिवाजी कोकरे यांचा मृत्यू कोंडीग्रे गावी झाला व त्यांनी पुढे कथन केले आहे की, त्याचा रेल्वे पुलाखाली मौजे हातकणंगले येथे मृत्यू झाला होता. पक्षकारांनी त्या अनुषंगाने भिस्त शिवाजी कोकरे यांच्या मृत्यू प्रमाणपत्रावर (नि.क्र.२७) वर ठेवलेली आहे. त्याचे अवलोकन करता ते मौजे हातकणंगले येथील निबंधकाकडुन दिल्याचे दिसुन येत नसुन ते निबंधक, कोंडीग्रे यांचेकडुन दिल्याचे दिसुन येत आहे. वादींनी शिवाजी कोकरे हे हातकणंगले येथे मयत झालेबाबत आवश्यक तो कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. उलटपक्षी प्रतिवादींच्या कथनावर व कागदोपत्री पुराव्यावरुन त्याची एकमेकांशी साखळी जोडत असल्याचे सिध्द होते. त्यामुळे वादींच्या कथनावर शंका उपस्थीत होण्यास वाव असल्याचे दिसुन येत आहे.

**१९.** मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, शिवाजी कोकरे यांचा विवाह हिंदू रितीरिवाजानुसार इंदूबाई कोकरे यांचेसोबत दि.१४/०५/१९९० रोजी झाला अथवा कसे याबाबत त्यांना माहित नाही. सदर बाब ही अत्यंत महत्वपुर्ण आहे. सदर साक्षीदारानेच शिवाजी व इंदूबाई यांचा विवाह झाल्याचे कथित कथन हे स्पष्टपणे नाकारल्याचे दिसुन येत नाही. उलटपक्षी त्याबाबत त्यांनी त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्यावरुनदेखील वादींच्या सदरहू कथनावर शंका उपस्थित होत आहे.

२०. मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, त्यांचे शिवाजीसोबत लग्न झाल्याचे दर्शविण्याकरिता त्यांच्या भंडा–याची यादी त्यांनी या प्रकरणात दाखल केलेली नाही, त्या लग्नानंतर कोंडीग्रे गावामध्ये राहत होते असे दर्शविणारे दस्त ऐवज त्यांचेकडे आहेत. ते दस्त ऐवज त्यांनी न्यायालयात हजर केलेले नाहीत, सदर दस्त ऐवज न्यायालयात दाखल करण्यास अडचण होती अथवा कसे हे त्यांना माहित नाही. या सर्व उत्तरावरुन असे स्पष्ट होते की, वादींनी त्यांच्या सदरहू कथनाच्या पुष्टर्थ कोणताही आवश्यक तो कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द केला नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर शंका उपस्थीत होण्यास वाव असल्याचे दिसुन येत आहे.

२१. मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, ते हातकणंगले येथे राहत असलेचे दर्शविण्याकरिता कागदोपत्री पुरावा दाखल करु शकतात. परंतू त्यांनी त्यासंबंधी आवश्यक तो कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. तसेच त्यांनी पुढे उलटतपासात कथन केले आहे की, त्यांचा शिवाजीसोबत विवाह झाल्याचे दर्शविणारा पुरावा ते प्रकरणात दाखल करणार आहेत. परंतू त्याही अनुषंगाने त्यांनी कथित कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे संधी असुनही व पुरावा दाखल करणार असे कथन करुनही त्यांनी त्यासंबधी आवश्यक तो कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द न केल्यामुळे वादींच्या सदरहू कथनास कागदपत्रांची जोड असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

२२. मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, शिवाजी व प्रतिवादी क्र.३ इंदूबाई यांचे लग्न झाले अथवा कसे हे त्यांना माहित नाही, तसेच त्यांनी कबुल केले आहे की, त्याबाबत दाव्याच्या परिच्छेद क्र.४ मध्ये लिहीलेला मजकुर चुकीचा आहे. सदरचे कथन हेदेखील अत्यंत महत्वपुर्ण आहे. वादी क्र.१ यांनीच कबुल केले आहे की, दाव्याच्या परिच्छेद क्र.४ मधील मजकुर हा चुकीचा आहे. त्यामुळे वादी हे स्वच्छ हाताने न्याय मागण्यासाठी आल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादींनीच आपल्या कथनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर

उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२३.** तात्यासो (वादीतर्फे सा.क्र.२) (नि.क्र.४१) यांनी सरतपासात कथन केले आहे की, आण्णासो सत्याप्पा कब्बुरे व त्यांचा चुलता मारुती जुगळे हे सदर लग्नाला हजर होते. परंतू अत्यंत महत्वपुर्ण बाब अशी की, वादींनी त्या कथित लोकांना संधी असुनही अभिलेखावर तपासले नाही. त्यामुळे वादी हे पुराव्याची साखळी जोडण्यास असमर्थ झाल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२४.** तात्यासो (वादीतर्फे सा.क्र.२) (नि.क्र.४१) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, त्यांचा विवाह कोंडीग्रे येथील बिरोबा मंदिरात झाले नसल्याचे मथुरा हिचे म्हणणे चुकीचे आहे. त्यामुळे वादी क्र.१ व सदर साक्षीदार यांच्या कथनात देखील एकवाक्यता असल्याचे दिसुन येत नाही. त्यांनी पुढे कथन केले आहे की, सदर लग्न जमल्याबाबत कोणत्याही यादया अथवा लेखी करार झाला नव्हता. परंतू वादी क्र.१ च्या उलटतपासातील कथनानुसार भंडा–याची यादी झाली होती. तसेच सदर साक्षीदाराने उलटतपासात कथन केले आहे की, शिवाजी याचे मौजे कोंडीग्रे येथे शिधापत्रक नव्हते. परंतू अभिलेखावरील शिधापत्रक (नि.क्र.३३) हे त्या कथनास छेद देत असल्याचे दिसुन येत आहे. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले आहे की, याच दरम्यान शिवाजी हा सन २००८ मध्ये हातकणंगले येथे रेल्वे पुलाच्या बाजुला मयत झाला व त्यावेळी ते हजर होते. परंतू उलटतपासात त्यांनी कथन केले आहे की, सदर मृत्यू दाखल्यानुसार शिवाजी याचा मृत्यू मौजे कोंडीग्रे येथे झाला अथवा कसे हे ते नक्की सांगू शकत नाहीत. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या कथनावरुन तो कागदपत्राशी सुसंगत वाटत नाही. तसेच तो वादी क्र.१ च्या कथनाशी साखळी प्रमाणे जोडत असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२५.** तात्यासो (वादीतर्फे सा.क्र.२) (नि.क्र.४१) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, शिवाजी व मथुरा हे इचलकरंजी येथे एका माडी असलेल्या घरामध्ये राहत

होते, त्या घराचा मालक कोण होता अथवा ते घर कोणत्या वसाहतीमध्ये आहे हे त्यांना नक्की सांगता येणार नाही. तसेच मौजे हिंगणगाव, ता.हातकणंगले येथे एकत्र राहिल्याबाबत मथुरा व शिवाजी यांचे शिधापत्रक अथवा मतदार यादीमध्ये नाव नव्हते. त्यामुळे सदरहू साक्षीदाराच्या कथनास कोणत्याही कागदोपत्री पुराव्याची जोड असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२६.** मथुरा उर्फ संगिता (वादी क्र.१) (नि.क्र.१९) यांनी उलटतपासात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ ज्ञानेश्वर व प्रतिवादी क्र.५ गणेश यांची जन्म तारीख अनुक्रमे दि.२५/१०/१९९१ व दि.२०/०१/१९९४ आहे अथवा कसे हे त्यांना माहित नाही. तसेच प्रतिवादी क्र.४ व ५ ही शिवाजी व इंदूबाई यांची मुले आहेत अथवा कसे हेदेखील त्यांना माहित नाही. तसेच त्या दोघांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी करण्याचे कारण ते सांगू शकत नाहीत. सदर कथनावरुन प्रतिवादींच्या स्टेटस बाबत व त्यांच्याविरुध्द दावा दाखल करण्याच्या कारणाबाबत सदर साक्षीदारानेच अनभिज्ञता दर्शविल्याने त्यांच्या साक्षीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सदर साक्षीदाराने त्यांची जन्मतारीख ही दि.०१/०६/१९७५ अशी आहे असे कथन केले आहे. तसेच त्यांचे कथित लग्न हे दि.०७/०५/१९८७ रोजी झाल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्यांचे कथित लग्न हे वयाच्या जवळपास १२ ते १३ वर्षामध्ये झाल्याचे त्यांचेच कथन असल्याचे दिसुन येत आहे. त्यावरुनदेखील त्यांचे शिवाजीशी कथित लग्न झाले आहे का यावर निश्चीतच शंका उपस्थीत होते. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२७.** जन्म प्रमाणपत्र (नि.क्र.२६) व लाईटबिल (नि.क्र.२८) पाहता त्यामध्ये जन्म प्रमाणपत्रावर संगिता तर लाईट बिलवर मथुरा असे नाव असल्याचे दिसुन येते. त्यामध्ये देखील नावामध्ये तफावत आहे. त्यामुळे केवळ उर्फ असे नमुद केल्याने त्याचा संदर्भ जोडणे हे योग्य होणार असल्याचे दिसुन येत नाही.

**२८.** तसेच आणखीन एक बाब नमुद करणे गरजेची वाटते ती म्हणजे वादी क्र.१

ने सरतपासाच्या शपथपत्रामध्ये कलम नं.४ मध्ये नमुद केले आहे की, त्यांना व शिवाजी यांना मुलगा नसलेने शिवाजीचे आई–वडीलांनी वंशास दिवा पाहिजे म्हणुन दुसरे लग्न प्रतिवादी नं.३ हिचे बरोबर लावणेचा बनाव केला. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र.४ व ५ संबंधी अभिलेखावर सिध्द झालेले सर्व कागदपत्र जसे की, जन्म दाखले पाहता ते वादी कथित वादी क्र.२ च्या जन्माच्या आधीचे आहेत. सदर बाब ही अत्यंत महत्वपुर्ण आहे. तसेच वादी क्र.१ च्या कथनानुसार वादी क्र.२ ची जन्म तारीख ही प्रतिवादी क्र.४ व ५ च्या आधी पाहिजे. परंतू ती तशी नाही. याउलट वादी क्र.२ ची जन्म तारीख ही प्रतिवादी क्र.४ व ५ च्या नंतरची आहे. त्यामुळे केवळ वादी क्र.२ च्याच हक्कापुरता विचार करावा लागला तरी वादी क्र.१ ने वादी क्र.२ च्या स्टेटस बाबत स्वतःच निश्चीत अशी शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे केवळ तिच्या हिश्याबाबत कथन खरे मानायचे असल्यास देखील त्यावर वादी क्र.१ नेच शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसुन येत आहे.

**२९.** वर नमुद प्रमाणे वादीतर्फे साक्षीदार तात्यासो यांनी देखील प्रतिवादी क्र.४ व ५ बाबत त्यांच्या उलटतपासामध्ये अनभिज्ञता दर्शविल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांनीदेखील त्याबाबत स्पष्टपणे नकार असल्याचे कथन केले नाही. वादींनी आपली भिस्त ही खालील न्यायनिवाडयावर ठेवलेली आहे.

***1) Tulsa and Ors. Vs. Durghaitya and Ors. AIR 2008 Hon'ble Supreme Court 1193***

Presumption as to marriage – Continuous living of 'L' with 'R' after death of her husband, established by evidence on record – She has legitimate claim over property or 'R' as his wife and can be sold by her.

परंतू या प्रकरणातील तथ्ये व वर नमुद न्यायनिवाडयातील तथ्ये ही एकमेकांशी सुसंगत असल्याचे दिसुन येत नाही. तसेच वादींनी ते शिवाजी सोबत राहत असलेबाबत व वादी क्र.१ व शिवाजी यांचे लग्न झाले असलेबाबत कोणताही आवश्यक तो

पुरावा त्यांनी अभिलेखावर सिध्द केला नाही. वादी क्र.१ यांनी तसा पुरावा आहे व ते दाखल करणार असे सांगुनही तो दाखल करुन अभिलेखावर सिध्द केला नसल्यामुळे सदर न्यायनिवाडयाची मदत ही वादींना होत असल्याचे दिसुन येत नाही.

३०. प्रतिवादींनी केलेले कथन हे त्यांनी कागदपत्रांच्या आधारे सिध्द केल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादींतर्फे प्रतिवादी क्र.४ व ५ च्या बाबतीत केलेले कथन हे वर नमुद कागदपत्राआधारे सिध्द केलेले आहे. त्यामुळे या क्षणी वर नमुद कथन व कारणानुसार वादींचे कथन हे प्रतिवादींच्या कथनापेक्षा सरस असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादींनी वादी क्र.१ ही शिवाजी रामा कोकरे यांची कायदेशीर लग्नाची पत्नी असल्याचे सिध्द केले नाही. तसेच केवळ लाईट बिलावरुन नातेसंबंध हा सिध्द होवू शकत नाही. जन्म प्रमाणपत्र नि.क्र.२६ वर वादी क्र.२ च्या नावाचा उल्लेख दिसुन येत नाही. वादी क्र.१ ने मथुरा व संगिता याबाबत देखील सांगड असल्याचे अभिलेखावर सिध्द केले नाही. त्यामुळे केवळ प्रतिवादी क्र.३ यांनी उलटतपासात कबुल केले आहे की, शिवाजी यांना दारुचे व्यसन असल्यामुळे व बाहेर काढल्यामुळे तो बाहेर जावुन काय करत होता हे त्यांना माहित नाही म्हणजे वादी क्र.१ व शिवाजीचे लग्न झाले असे होत नाही व त्या कथित लग्न संबंधातुन वादी क्र.२ चा जन्म झाला हे ही सिध्द होत नाही. वादींनी आपली केस ही स्वतःहुन सिध्द केली पाहिजे. वर नमुद कथन व कारण पाहता वादींनी आपली केस ही सिध्द केली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.३ च्या साक्षीचा फायदा होणार नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादींनी वादी क्र.२ हिचा वादी क्र.१ व शिवाजी यांचे कायदेशीर लग्न संबंधातुन जन्म झाल्याचे सिध्द केले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्र.३ ते ६ करीता</u>**

३१. मुद्दे क्र.३ ते ६ हे एकाच साखळीतील दुवे असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रीत केले आहे.

३२. वादींनी हे सिध्द केले नाही की, वादी क्र.१ व शिवाजी यांचा कायदेशीर विवाह झाला होता व त्यातुन वादी क्र.२ हिचा जन्म झाला आहे. वादींच्याच कथनानुसार ते

शिवाजी यांच्या मिळकतीमुळेच दावा मिळकतीत वाटणी मागत आहेत. परंतू वादींनी त्यांच्यासोबत असलेले शिवाजी यांचे नाते हे अभिलेखावर सिध्द केले नाही. त्यामुळे दावा मिळकत ही वादींच्या एकत्र कुटूंबातील मिळकत असल्याचे सिध्द होत नाही. त्याही पुढे जावुन वादींनी दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व वाटपालायक मिळकती समाविष्ट असणे गरजेचे आहे. तरी वादी क्र.१ यांनी उलटतपासात कथन केले आहे की, शिवाजी अथवा त्यांच्या कुटूंबियांच्या नावे मौजे हिंगणगाव, ता.हातकणंगले येथे एक घर आहे, त्याबाबत दस्तऐवज त्यांनी प्रकरणात दाखल केले आहेत. परंतू दावा मिळकत पाहता त्यामध्ये त्या कथित मिळकतीचा समावेश असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यास संपुर्ण वाटपालायक मिळकती समाविष्ट नसल्याची देखील बाधा येत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादींनी हे सिध्द केले नाही की, दावा मिळकत ही वादींची एकत्र कुटूंबाची मिळकत आहे व ते त्यामध्ये वाटप होवुन मिळणेस पात्र आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्र.३ व ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. तसेच त्यामुळे वादी हे वर नमुद कथन व कारणास्तव दरम्यानच्या उत्पन्नास व मनाई हुकूमास देखील हक्कदार नाहीत. प्रतिवादींतर्फे वाटपाबाबत कोणतेही कथन व मागणी असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ व ५अ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.६ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. वादीचा दावा हा नामंजूर करण्यात येतो.

२. सदर दाव्याचा खर्च हा ज्याचा त्याने सोसावा.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला )

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.05 17:59:19 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिनांक: ०५/०५/२०२६ जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 05/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 05/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 05/05/2026. |